॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**EXAMINATION SECTION**

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com

जा.क्र: परीक्षा/कला/ २०१९–२०/ 822 दिनांक: ०५.०७.२०१९

# परीपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
प्रस्तूत विद्यापीठ.

**विषय — बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम. व बी.बी.ए. अभ्यासक्रमाच्या परीक्षा पध्दती मध्ये बदला बाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०८/०५/२०१९ रोजी संपन्न झालेल्या मा.विद्यापरीषदेच्या बैठकीतील ठरावानुसार बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम., बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस. व इतर अभ्यासक्रमाच्या प्रथम, व्दित्तीय वर्षाचे एम.सी.क्यू परीक्षा पध्दती बंद करण्याचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार यापुढे बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम. बी.बी.ए. व इतर अभ्यासक्रमातील प्रथम व व्दितीय वर्षाची नियमीत विद्यार्थ्यांची परीक्षा ही थेअरी पध्दतीने खालील प्रमाणे घेण्यात येणार आहे.

१. सदरील परीक्षा पध्दती हिवाळी २०१९ परीक्षेपासून लागू करण्यात येणार आहे.
२. शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० मधील प्रथम, तृतीय व पाचवे सत्रातील नियमीत विद्यार्थ्यांची हिवाळी—२०१९ ची परीक्षा ही थेअरी पॅटर्न नुसार होणार आहे व याच पध्दतीने नियमीत सत्रांची उन्हाळी—२०२० ची परीक्षाही घेण्यात येणार आहे.
३. बी.ए. व बी.एस्सी. अभ्यासक्रमातील प्रथम, व्दित्तीय व तृतीय वर्षातील ऐच्छिक विषयांच्या दोन्ही पेपरची परीक्षा एकाच दिवशी एकत्रित घेण्यात येणार आहे.
४. दोन्ही पेपरसाठी तीन तांसाचा कालावधी देण्यात येणार आहे.

५. प्रत्येक पेपरसाठी २० पानी स्वतंत्र उत्तरपुस्तिका देण्यात येणार आहे.

६. बी.एस्सी. द्वितीय व तृतीय वर्षातील CGPA अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना तीन पेपर्स पैंकी दोन पेपरची एकत्रित परीक्षा घेवून उर्वरीत एका पेपरची परीक्षा स्वंतत्र घेण्यात येईल.

७. बी.ए. तृतीय वर्षातील CGPA अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना तीन पेपर्स पैंकी दोन पेपरची एकत्रित परीक्षा घेवून उर्वरीत एका पेपरची परीक्षा स्वंतत्र घेण्यात येईल.

८. बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम., बी.बी.ए. व इतर अभ्यासक्रमातील ( I, II, III, IV) सत्रातील अनुत्तीर्ण (Backlog) विद्यार्थ्यांना (Theory + MCQ) पॅटर्न प्रमाणे परीक्षा देण्यासाठी हिवाळी २०१९ व उन्हाळी २०२० अशा केवळ दोन संधी देण्यात येणार आहेत. यानंतर अनुत्तीर्ण राहणा—या विद्यार्थ्यांनी नवीन अभ्यासक्रमानुसार/नविन परीक्षा पध्दतीनुसार केवळ अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

९. वरीलप्रमाणे प्रमाणे परीक्षा घेताना सर्व परीक्षा केंदप्रमुखांनी **Backlog (Theory + MCQ) Pattern** च्या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था ही स्वतंत्र हॉल मध्ये करावी जेणे करुन नियमीत विद्यार्थ्यांच्या परीक्षेमध्ये व्यत्यय येणार नाही.

सबब, शैक्षणीक वर्ष २०१९—२०२० पासून वरील प्रमाणे परीक्षा पध्दतीतील बदलाची नोंद घ्यावी व ही बाब सर्व संबंधित शिक्षक, विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणुन द्यावी.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

<u>प्रत माहितीस्तव:</u>

१) मा.कुलगुरु महोदय प्रस्तुत विद्यापीठ.

२) मा. अधिष्ठाता/मा. प्र.अधिष्ठाता/मा.प्र. सहयोगी अधिष्ठाता सर्व विद्याशाखा प्रस्तुत विद्यापीठ.

३) उपकुलसचिव व सहाय्यक कुलसचिव परीक्षा विभाग प्रस्तुत विद्यापीठ.

४) उपकुलसचिव अभ्यासमंडळ, शैक्षणिक विभाग प्रस्तुत विद्यापीठ.